ईलिलाव सुचना

13530

जा.क्रं.नांवाशमनपा/जवमा/ /२०२५
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
दिनांक - 5 FEB 2025

## ई - लिलाव सुचना

सर्व जनतेस व ठेकेदारांना या जाहिर ई-लिलाव (E-AUCTION) सुचनेद्वारे कळविण्यात येते की, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील **तयबाजारी, आठवडी बाजार, दैनिक जमीन भाडे (नो हॉकर्स झोन वगळून) भाडे वसुलीचा** मक्ता ताबा तारखेपासून एक वर्षाच्या कालावधी पर्यंत नियम व अटीनुसार द्यावयाचा आहे.

इच्छुक लिलावधारकांना/ठेकेदारांना लिलावात विहित मुदतीत भाग घेण्यासाठी (https://eauction.gov.in) या संकेतस्थळावर digital signature चे रजिस्ट्रेशन करणे अनिवार्य आहे.

लिलावधारक/ठेकेदार यांनी लिलावाची कोरी निविदा किंमत (Tender Fee) रुपये १५०००/- ना परतावा व अनामत रक्कम रूपये ५,००,०००/- रक्कमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डी.डी.) च्या स्वरूपात, आधारकार्ड, पॅनकार्ड सिलबंद लिफाफ्यात आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांचे नावे दि. 06/02/2025 रोजी १५ : ०० वाजे पासून ते दि. 12/02/2025 रोजी १५ : ०० वाजे पर्यंत (शासकीय सुट्टीचे दिवस सोडून कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत) मालमत्ता विभाग, मुख्य प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, रूम नं. २१५ नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड या कार्यालयाकडे जमा करावेत.

सदरील मक्त्याच्या नियम व अटी (https://eauction.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून ई-लिलाव (E-AUCTION) ऑनलाईन वर खरेदी व जमा करण्यात यावे. निविदा फक्त इंटरनेटवर खरेदी करता येतील व ऑनलाईन भरता येतील.

### ई-लिलाव प्रक्रियेचे वेळापत्रक

| अ.क्रं | तपशिल | लिलाव प्रसिद्धीचा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | प्रसिद्ध दिनांक | 06/02/2025 | १५:०० |
| २ | कागदपत्र/इसारा रक्कम सुरु करण्याचा दिनांक व वेळ | 06/02/2025 | १६:०० |
| ३ | कागदपत्र/इसारा रक्कम सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | 12/02/2025 | १५:०० |
| ४ | कागदपत्र/इसारा रक्कम मंजुरीचा दिनांक व वेळ | 12/02/2025 | १५:०० |
| ५ | कागदपत्र/इसारा रक्कम मंजुरीचा अंतिम दिनांक व वेळ | 13/02/2025 | १८:०० |
| ६ | ई-लिलाव सुरु करण्याचा दिनांक व वेळ | 14/02/2025 | ११:०० |
| ७ | ई-लिलाव अंतिम दिनांक व वेळ | 14/02/2025 | १५:०० |

कोणतेही कारण न देता लिलाव अंशतः/पुर्णता मंजुर किंवा नामंजुर करण्याचा अंतिम अधिकार मा.आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना राखुन ठेवला आहे.

ई-लिलाव बाबत काही शंका अथवा तांत्रिक अडचणी असल्यास कृपया २४X७ हेल्पलाईन नं.१८००-३०७०-२२३२ या टोल फ्रि नंबरवर संपर्क साधावा.

स्वा/-
उपआयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

प्रतिलिपी :-

१) संपादक, दै. लोकपत्र २) दै. सामना / प्रजावाणी यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदरील लिलावाची जाहिर सूचना आपल्या दि. 6/2/25 च्या वृत्तपत्रात 12X20 चौ.मी. आकारात कमीत कमी जागेत प्रसिद्ध करून बिलाच्य २ प्रती शासनाच्या मान्यतेच्या प्रतीसह सादर करावे.

२) मुख्यलेखा परिक्षक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

३) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

४) अंतर्गत लेखा परिक्षक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

५) ई-टेंडरींग/ऑक्शन विभाग, संगणक विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

६) नोटीस बोर्ड, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

उपआयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत तयबाजारी, आठवडी बाजार, दैनिक जमीन भाडे (नो हॉकर्स झोन वगळुन) वसुली मक्ता जाहिर लिलाव नियम व अटी.

१. जाहिर लिलावात भाग घेण्यासाठी लिलाव फिस रूपये १५०००/- ना परतावा व अनामत रक्कम रू.५,००,०००/- (अक्षरी - पाच लक्ष रूपये फक्त) (राष्ट्रीयकृत बँकेचे धनाकर्ष) महानगरपालिकेत जमा करावे लागतील.

२. महानगरपालिकेने दिपावली, ईद निमीत्त, उबदार कपडे विकणाऱ्यास, मंडपास, स्टॉल, गाडे विक्रेते इत्यादींना तात्पुरते स्वरूपात परवानगी दिल्यास तसेच वाहनतळाच्या जागेचा लिलाव केल्यास त्यांचेकडून तयबाजारी फिस वसूल करता येणार नाही.

३. मक्त्याची सरकारी बोली रु. ८२,२५,०००/- (अक्षरी - ब्याऐंशी लाख पंचवीस हजार रूपये फक्त) राहिल. बोली रु.२५,०००/- च्या टप्प्याने बोलने अनिवार्य आहे. तसेच मक्त्याचा कालावधी आदेश/ताबा तारखेपासून एक वर्षा करिता राहिल. जाहिर लिलावात ज्याची बोली रक्कम सर्वात जास्त असेल त्याचे नावे नियम व अटीनुसार करारनामा केल्यानंतर मक्ता देण्यात येईल.

४. सुरक्षाठेव रक्कम म्हणुन, मक्ता ज्या रक्कमेमध्ये अंतीम होईल त्या रक्कमेच्या एक महिन्याच्या रक्कमे इतकी रक्कम कार्यालयात जमा करावी लागेल (ज्या ठेकेदारास मक्ता मिळाला आहे, त्या ठेकेदाराची अनामत रक्कम सुरक्षाठेव रक्कम म्हणून ठेवण्यात येईल व उर्वरित रक्कम भरणा करावी लागेल.) तसेच बोलीत बोललेल्या अंतीम रक्कमे पैकी २५ टक्के रक्कम ७ दिवसाच्या आत मनपा फंडात जमा केल्यानंतर, करारनामा करून नियम व अटीनुसार मक्ता परवाना देण्यात येईल. सदरची रक्कम कार्यालयात जमा न केल्यास, अनामत रक्कम जप्त करून पुनश्च जाहिर लिलाव घेण्याचे अधिकार मा. आयुक्त, मनपा नांदेड यांना राहतील.

५. उर्वरीत रक्कम कार्यारंभ आदेशाच्या तारखेपासून समान तीन त्रैमासिक हप्त्यामध्ये जमा करावी लागेल. वरील मुदतीत रक्कम जमा न केल्यास १५ टक्के व्याज आकारण्यात येईल.

६. सदर मक्त्याच्या रक्कमेसाठी वेगळा करारनामा व जमानतनामा करून द्यावा लागेल. त्रैमासिक हप्त्याची रक्कम नमूद तारखेस न भरल्यास १५ टक्के व्याज आकारून लेखी कळविण्यात येईल. तद्नंतर पण रक्कम जमा न केल्यास मक्ता रद्द करून पुनर्लिलाव करण्याचा अधिकार मा. आयुक्त, महानगरपालिका,नांदेड यांना राहिल.

७. आयुक्त, मनपा नांदेड यांनी महाराष्ट्र शासनाचे निर्णयाप्रमाणे पीच परवाने दिले आहेत. त्यांचेकडून तयबाजारी फिस वसूल करता येणार नाही.

८. महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या दरपत्रका प्रमाणेच फिस वसूल करावी लागेल. तसेच नियमा प्रमाणे वेळोवेळी देण्यात येणाऱ्या आदेशाची अंमलबजावणी करणे ठेकेदारास बंधनकारक असेल. नियमा विरूद्ध व आदेशाचे पालन न केल्यास मक्ता रद्द करून मक्ता रक्कम + अनामत रक्कम महानगरपालिका फंडात जमा करण्यात येईल.

९. पुर्वीच्या थकबाकीदार ठेकेदारांना प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष लिलावात भाग घेता येणार नाही.

१०. भाडे वसूलीचे पावती पुस्तके/पावत्या मालमत्ता व्यवस्थापक यांना दाखवून त्यावर महानगरपालिकेचा शिक्का मारून घ्यावा लागेल. तसेच सदर पावती पुस्तकाची नोंद महानगरपालिकेच्या नोंद रजिस्टरमध्ये घेण्यात येईल. जर वसुलीसाठी मशिनीचा वापर करावयाचा असेल तर त्याबाबतची लेखी परवानगी घ्यावी लागेल. तसेच तयबाजारी देय व्यक्ती फिस देण्यास नकार देतील त्या बद्दलचे वसूलीचे अधिकार गुत्तेदारास राहतील.

११. नैसर्गीक/आपत्ती किंवा इतर कारणाने सार्वजनिक रस्त्या लगत अतिक्रमणे काढल्याने तसेच आठवडी बाजार बंद झाल्यामुळे ठेकेदाराचे नुकसान झाल्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही किंवा नुकसान भरपाई मिळणार नाही व ती मागताही येणार नाही.

१२. जाहिर लिलाव अंतीम करण्याचे सर्व अधिकार आयुक्त, महानगरपालिका नांदेड यांना राहतील.

उपआयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड